# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १९ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

✻✻✻✻

✻ ई प्रॉपर्टी कार्ड हा फक्त दस्तऐवज नव्हे तर आर्थिक सुरक्षेची हमी–पंतप्रधानांचं प्रतिपादन

✻ मुंबईत आता एकाच तिकिटावर लोकल, बेस्ट, मेट्रो आणि मोनो प्रवास करता येणार

✻ विविध जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर–उपमुख्यमंत्री अजित पवार बीडचे पालकमंत्री

✻ राज्यातल्या जवळपास चार हजार अपात्र महिलांची लाडकी बहीण योजनेतून माघार

✻ आयसीसी अजिंक्यपद चषक स्पर्धेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय क्रिकेट संघ जाहीर

आणि

✻ खो–खो विश्वचषक स्पर्धेत भारताच्या महिला आणि पुरुष संघांची अंतिम फेरीत धडक

✻✻✻✻

स्वामित्व योजनेअंतर्गत दिले जाणारे ई प्रॉपर्टी कार्ड अर्थात मालमत्ता सनद हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्ड अर्थात मालमत्ता सनद वितरण कार्यक्रमाला काल पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. स्वामित्व योजनेमुळे छोट्या गावांना होणाऱ्या लाभाबद्दल पंतप्रधान म्हणाले...

**स्वामित्व योजना से गांव के विकास की प्लानिंग और उस पर अंमल अब काफी बेहतर हो रहे है। आज हमारे पास स्पष्ट नक्शे होंगे, तो विकास काम की प्लानिंग भी सटीक होंगी। अब प्रॉपर्टी राईटस् मिलने से ग्राम पंचायतों की मुश्किलें भी दूर होंगी।**

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं असून, दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी प्रॉपर्टी कार्डस् तयार करण्यात आली आहेत. काल झालेल्या या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतली ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् पंतप्रधानांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत सह्याद्री अतिथीगृहातून ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात मालमत्ता सनदींचं वाटप करण्यात आलं.

महाराष्ट्रातल्या १५ हजार गावांमध्ये या कार्डांचं वाटप होणार आहे. छत्रपती संभाजीनगर इथं सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत, नांदेड इथं खासदार अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत, परभणी इथं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या उपस्थितीत, तर अहिल्यानगर इथं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात मालमत्ता सनद वाटप करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर इथले या योजनेचे लाभार्थी अमोल बोरसे यांनी आपला अनुभव या शब्दांत कथन केला...

**माझ्याकडे याअगोदर स्वतःचे घर नव्हते. मला पी आर कार्ड मिळाले. पी आर कार्ड आधारे मी बँक ऑफ बडोदाकडून बारा लाख पंचवीस हजार रूपये लोन घेतले. आणि त्या लोन मुळे मी माझं नवीन घराचे बांधकाम केले. यासाठी मी आभारी आहे.**

****

मुंबईत आता एकाच तिकिटावर उपनगरी रेल्वे, बेस्ट बस, मेट्रो, मोनो आणि एसटीने प्रवास करता येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. या मंचाद्वारे लाखो मुंबईकरांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. ते म्हणाले..

आत्तापर्यंत मेट्रो, बेस्ट, असे सगळे ट्रान्सपोर्ट सिस्टीम प्लॅटफॉर्मवर आणले होते. आपली सबअर्बन रेल्वे देखील त्याच्यावर आणणं गरजेचं होतं, कारण ती मुंबईची लाईफ लाईन आहे. आज त्याला ही मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता मुंबईच्या लोकांना सगळ्या ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम्स एका प्लॅटफॉर्मवर, एका तिकीटावर वापरता येतील.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११८ वा भाग असेल. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रजासत्ताक दिन असल्यामुळे या महिन्यात हा कार्यक्रम आज होत आहे.

****

राज्यातील विविध जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती काल जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रिपद असणार आहे तर ॲड.आशिष जयस्वाल यांच्याकडे सहपालकमंत्रिपद सोपवण्यात आलं आहे.

**राज्यातील विविध जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती काल जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असणार आहे तर ॲड.आशिष जयस्वाल यांच्याकडे सहपालकमंत्रीपद सोपवण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाणे या दोन जिल्ह्यांचं तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद देण्यात आलं आहे.**

**मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री म्हणून संजय शिरसाट, जालना– पंकजा मुंडे,नांदेड– अतुल सावे, लातूर–शिवेंद्रसिंह भोसले, धाराशिव– प्रताप सरनाईक, परभणी– मेघना बोर्डीकर तर हिंगोलीचे पालकमंत्री म्हणून नरहरी झिरवाळ यांना जबाबदारी देण्यात आली आहे.**

****

राज्यातल्या सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ–सीबीएसई प्रारुप लागू करणार असल्याचं शालेय शिक्षणमंत्री

दादा भुसे यांनी सांगितलं आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीसाठी हे प्रारुप लागू होईल. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इतर इयत्तांसाठी नवे अभ्यासक्रम आखले जाणार आहेत.

****

राज्यातल्या जवळपास चार हजार अपात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेतून माघार घेतली असल्याची माहिती, महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. तक्रार प्राप्त झालेल्या इतर लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी सुरू आहे. या योजनेत जानेवारी महिन्याचे पैसे लाडक्या बहिणींना २६ जानेवारी पूर्वी दिले जातील, असंही आदिती तटकरे यांनी सांगितलं.

****

दरम्यान, लाडकी बहिण योजनेसाठी पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा, हीच शासनाची भूमिका असल्याचं, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. मराठवाड्यात उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत असून रोजगारांच्या संधी मोठ्या प्रमाणार वाढणार असल्याचं शिरसाट यांनी सांगितलं.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयने आगामी आयसीसी अजिंक्यपद चषकासाठीच्या स्पर्धा संघाची घोषणा केली आहे. या संघाचं कर्णधारपद रोहित शर्मा याच्याकडे असून, शुभमन गीलकडे उपकर्णधारपद देण्यात आलं आहे. या स्पर्धेत भारताचा पहिला सामना २० फेब्रुवारीला बांगलादेशाविरोधात होणार आहे.

दरम्यान, भारतीय क्रिकेट संघाची इंग्लंड संघाविरोधात पाच टी ट्वेंटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होणार आहे. २२ जानेवारीपासून १२ फेब्रुवारीपर्यंत हे सामने होणार आहेत.

****

खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारताच्या महिला आणि पुरुष संघांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात, महिलांच्या संघानं दक्षिण अफ्रिकेच्या संघावर ६६-१६ अशा फरकानं विजय मिळवला. तर, पुरुष संघानेही दक्षिण अफ्रिका संघावर ६२-४२ अशी मात केली. दिल्लीत सुरू असलेल्या या स्पर्धेत, आज अंतिम फेरीच्या सामन्यात भारतीय महिला तसंच पुरुष संघांचा सामना नेपाळविरुध्द होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्थेचा पद्मविभुषण गोविंदभाई श्रॉफ स्मृती पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ भालचंद्र कांगो यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम अशा स्वरुपाचा हा पुरस्कार डॉ कांगो यांना आज प्रदान करण्यात येईल. छत्रपती संभाजीनगर इथं संस्थेच्या सभागृहात आज सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

****

धाराशिव इथला चंद्रकलादेवी पद्मसिंहजी पाटील स्मृती पुरस्कार तेर इथल्या कवयित्री शांता सलगर यांना जाहीर करण्यात आला आहे. स्मृतीचिन्ह, मानपत्र, आणि रोख रक्कम अशा स्वरुपाचा हा पुरस्कार येत्या २५ जानेवारीला सलगर यांना प्रदान करण्यात येणार आहे

****

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सहा आरोपींच्या पोलीस कोठडीची मुदत काल संपल्यानं, त्यांना बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं, या सर्वांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज समारोप होत आहे. शहरातल्या प्रोझोन मॉलमध्ये सायंकाळी पाच वाजता होणाऱ्या या सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण कैलास पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

दरम्यान, महागामीच्या शार्ङ्गदेव महोत्सवात काल सुखद मुंडे आणि सहकलाकारांचं पखावज वादन,

तसंच महागामीच्या गुरू पार्वती दत्ता आणि शिष्यांचं घर्घरिका हा कथक नृत्याविष्कार सादर झाला. प्रसिद्ध गायक भुवनेश कोमकली यांच्या गायनानं कालच्या सादरीकरणाचा समारोप झाला. आज महागामीच्या नृत्यसंचाचं ओडिशी सादरीकरण आणि गीता चंद्रन यांच्या भरतनाट्यम् ने या महोत्सवाची सांगता होणार आहे.

****

बीड इथं जिल्हास्तरीय सरस विक्री आणि प्रदर्शनात काल तिसऱ्या दिवसापर्यंत पाच लाख ८० हजार रुपयांची विक्री झाली. बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या शोभेच्या तसंच विविध गृहपयोगी वस्तू आणि खाद्यपदार्थांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

छत्रपती संभाजीनगर इथंही सरस प्रदर्शनाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचं, या महोत्सवात सहभागी महिलांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यात वाडीशेडोळचे सरपंच रूबाब शेख यांना मारहाण झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी निलंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, विद्युत खांब रोवण्याच्या वादावरून हा प्रकार झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं.

****

बीड जिल्ह्याच्या अंबेजोगाई तालुक्यात ममदापूर पाटोदा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंच मंगल राम मामडगे यांनी माजी सरपंचाविरोधात एक लाख रुपये खंडणी मागितल्याची तक्रार केली, त्यानुसार पोलिसांनी माजी सरपंच वसंत शिंदे यांच्यासह तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

****